# गीतांजली साठे यांची अधिकारीपदाला गवसणी



**सुळे :** मल्हारपेठ (ता. पन्हाळा) येथील गीतांजली गोपाळ साठे (सध्या रा. फुलेवाडी) यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सन २०२४ परीक्षेत यश संपादन केले. कष्ट, जिद्द, चिकाटी, धाडस, निरंतर वाचनाच्या जोरावर राजपत्रित वर्ग १ अधिकारीपदी गवसणी घातली. त्याबद्दल पंचक्रोशीतून त्यांचे कौतुक होत आहे. गीतांजली साठे यांचे प्राथमिक शिक्षण तारळे, ता. पाटण जि. प. शाळेत झाले. माध्यमिक महाराजा सयाजीराव हायस्कूल सातारा येथे, तर महाविद्यालयीन शिक्षण विवेकानंद कॉलेज, कोल्हापूरमध्ये झाले. पुढे त्यांनी शासकीय इंजिनिअरिंग कराड येथून मेकॅनिकल इंजिनिअरची पदवी प्राप्त केल्यानंतर विद्या प्रबोधिनी ॲकॅडमीमध्ये स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरू केला. पहिल्याच प्रयत्नात त्यांनी सहायक मोटर वाहन निरीक्षकचे पद मिळवले. पुढे विक्रीकर निरीक्षक, अन्न औषध प्रशासन, करनिर्धारण, प्रशासकीय अधिकारी गट अ नगरपरिषदा आदी एकापेक्षा एक सरस अशा स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण केल्या. त्यानंतर विक्रीकर निरीक्षक हे पद निवडले व ठाणे येथे रुजू झाल्या.

पुण्य नगरी ५ | बुधवार, १९ नोव्हेंबर २०२५

# 'विवेकानंद'कडून मोरजाई पठारावर जैवविविधता अभ्यास

## विद्यार्थ्यांकडून ३० किलो प्लास्टिक कचरा संकलन; पर्यावरणपूरक उपक्रमाला प्रतिसाद

कोल्हापूर : प्रतिनिधी

विवेकानंद ज्युनिअर कॉलेजच्या आर्टस्-कॉमर्स विभागामार्फत 'पर्यावरण शिक्षण आणि जलसुरक्षा' या विषयांतर्गत 'जैवविविधता अभ्यास व प्लास्टिक कचरा संकलन' हा उपक्रम गगनबावडा येथील मोरजाई पठारावर राबवण्यात आला. सह्याद्री पर्वतरांगेतील जैवविविधतेने नटलेले हे पठार दरवर्षी मोठ्या प्रमाणात पर्यटकांना आकर्षित करत असते; मात्र वाढत्या प्लास्टिक कचऱ्यामुळे या परिसरावर प्रदूषणाचे संकट निर्माण झाले आहे. त्यावर नियंत्रण व जैवविविधतेचा प्रत्यक्ष अभ्यास या उद्देशाने विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदवला.



बारावी आर्टस्-कॉमर्स वर्गातील ४१ विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी यांनी प्रत्यक्ष भटकंती करत येथील वनस्पती, पक्षी, प्राणी, कीटक यांचा अभ्यास केला. पर्यावरण विषय शिक्षक अनिल धस यांनी जैवविविधतेचे महत्त्व, पर्यावरणीय बदल व धोके याबाबत मार्गदर्शन केले. कचरा नियंत्रणासाठी विद्यार्थ्यांचे दहा गट तयार केले. प्रत्येक गटाला प्लास्टिक संकलनासाठी मोठी पिशवी देण्यात आली. विद्यार्थ्यांनी पाण्याच्या बाटल्या, अन्न पदार्थांच्या वेष्टन, पेले, चपला, कॅरी पिशव्या आदी सुमारे ३० किलो कचरा संकलन केले.

हा उपक्रम विभागप्रमुख शिल्पा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांचे सहकार्य लाभले. पी. वाय. राठोड, एस. एन. ढगे, नयना पाटील, संतोष कोले, स्टाफ सेक्रेटरी बी. एस. कोळी आदींनी सहकार्य केले.

पुढारी बुधवार, १९ नोव्हेंबर २०२५

# विवेकानंद कॉलेजकडून मोरजाई पठार येथे प्लास्टिक कचरा संकलन उपक्रम

**कोल्हापूर :** विवेकानंद ज्युनिअर कॉलेजच्या आर्टस्- कॉमर्स विभागामार्फत पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा विषयाअंतर्गत 'जैवविविधता अभ्यास व प्लास्टिक कचरा संकलन' उपक्रम मोरजाई पठार, गगनबावडा परिसरात राबविण्यात आला. पर्यावरणपूरक उपक्रमामध्ये अकरावी आर्टस्, कॉमर्सचे ४१ विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. पर्यावरण विषय शिक्षक अनिल धस यांनी जैवविधता वैशिष्ट्ये, त्याचे पर्यावरणीय महत्त्व, सद्यस्थिती व धोके याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी मोरजाई पठार परिसरामध्ये भटकंती करत येथील विविध वनस्पती, प्राणी, पक्षी, कीटक यांचा अभ्यास केला. विद्यार्थ्यांनी येथील नैसर्गिक अधिवासाच्या नोंदी घेत छायाचित्रण केले. येथे मोठ्या प्रमाणात होत असलेल्या प्लास्टिक कचरा प्रदूषण नियंत्रणासाठी येथील झाडाझुडपात टाकलेला प्लास्टिक कचरा संकलित करण्यात आला. उपक्रमाचे आयोजन विभागप्रमुख प्रा. शिल्पा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी पी. वाय. राठोड, प्रा. एस. एन. ढगे, प्रा. एन. एस. पाटील, पर्यावरण विषय शिक्षक ए. आर. धस, संतोष कोले यांनी सहभागी होऊन उपक्रम यशस्वी केला.

२ पुण्य नगरी ▮ बुधवार, १९ नोव्हेंबर २०२५

# विवेकानंद महाविद्यालयामध्ये रसायनशास्त्र विषयावर कार्यशाळा

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातर्फे अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत 'ॲनालिटिकल टेक्निक्स ॲप्लिकेशन इन फार्मासिटिकल ॲनालिसिस ॲंड क्वॉलिटी कंट्रोल' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळा पार पडली.

न्यू कॉलेज क्लस्टर अंतर्गत आयोजित या कार्यशाळेत विवेकानंद महाविद्यालयासह न्यू कॉलेज, शहाजी कॉलेज, कॉमर्स कॉलेज, छत्रपती शाहू कॉलेज या महाविद्यालयांतील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

सकाळ व दुपारच्या सत्रात डॉ. रवींद्र गायकवाड (भारती विद्यापीठ फार्मसी कॉलेज) व डॉ. अजित एकल (इन्स्टा व्हिजन, सातारा) यांनी विद्यार्थ्यांना औषधनिर्मितीत वापरल्या जाणाऱ्या विश्लेषणात्मक तंत्रज्ञानाचे महत्त्व, औषधांचे रासायनिक पृथ्थकरण, दर्जा नियंत्रित ठेवण्याची प्रक्रिया, तसेच या क्षेत्रातील उपलब्ध रोजगार संधी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्र. प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, डॉ. श्रुती जोशी, डॉ. वर्षा मैंदर्गी, डॉ. व्ही. बी. वाघमारे, डॉ. ए. एस. तपासे, डॉ. एस. डी. शिर्के, रजिस्ट्रार एस. के. धनवडे व प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.

19.11.25